# परिपत्रक क्रमांक 246

विषय :- लेखा अधिकारी मुख्य कार्यालयांना भेटी देण्यांबाबत .

असे निदर्शनास आले आहे की, धर्मादाय संघटनेच्या प्रादेशिक कार्यालयांतील काही लेखाधिकारी निरनिराळया कारणास्तव मुंबईतील मुख्य कार्यालयांना भेट देतात. ज्या कारणास्तव त्यांनी मुंबईला भेट दिलेली असते ती कारणे म्हणजे कार्यालयीन कामे महत्वाची नसतात. कार्यालयीन कामाची चौकशी करण्याकरीता लेखाधिकाऱ्याला मुख्य कार्यालयांत पाठविणे योग्य नाही. कार्यालयीन कामासंबंधीच्या प्रकरणाची चौकशी ही पत्रव्यवहाराव्दारेच करण्यात यावी. महत्वाचे व तातडीचे काम असल्यासच अगर धर्मादाय आयुक्त यांनी सूचना दिलेल्या असल्याशिवाय अशा प्रकारे अधिकाऱ्यांना मुंबईला पाठवू नये.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्य् राज्य,मुंबई.